# चौकटीबाहेरील कार्य - डॉ. अनिल नेरुरकर



अमेरिकेमध्ये राहून जिल्हयातील लाल मातीच्या ऋणातून काहीशा प्रमाणात मुक्त होण्यासाठी, येथील युवकांना मार्गदर्शन करण्यासाठी, जिभा तंबाखूमुक्त व्हाव्या यासाठी सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये व जिल्हयाचा सर्वांगीण विकासाच्या उद्‌देश्याने नि:स्वार्थी वृत्तीने आपले तन मन धन अर्पून काम करणारा अवलिया म्हणजे सिंधुदुर्ग जिल्हयातील पाट-परुळे तेरवळे गावचे सुपुत्र व अमेरिकेतील प्रसिध्द डॉक्टर अनिल नेरुरकर होय. डॉ. अनिल नेरुरकरांना एक प्रकारचे अवलियाच म्हटले पाहिजे. देवादिकांच्या, साधू संत महंतांच्या, कलाकारांच्या व देशाला-जगाला विविध क्षेत्रांत अनेक रत्ने दिलेल्या या जिल्हयाने देशालाच नव्हे तर जगाला डॉ. नेरुरकर यांच्या रूपाने एक अनमोल रत्नच दिले आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

डॉ. नेरुरकर यांचे मुळगांव पाट-परुळे तेरवळे असून वडील शांताराम नेरुरकर हेही डॉक्टर होते व ते मुंबईत वैद्‌यकीय व्यवसाय करायचे. डॉ. अनिल नेरुरकरांचा जन्म मुंबई येथे झाला. मुंबई येथील रॉबर्ट मनी टेक्निकल हायस्कूल येथे शालेय शिक्षण झाले. घरातच वडील डॉक्टर असल्याने डॉ. अनिल यांनाही वैद्‌यकीय क्षेत्राची आवड होती, त्यामुळे त्यावेळी S.S.C परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी वैद्‌यकीय क्षेत्र निवडून के.ई.एम. वैद्‌यकीय महाविद्‌यालयात प्रवेश घेवून एम.बी.बी.ई.एस. ही वैद्‌यकीय क्षेत्रातील पदवी घेतली. त्यानंतर के.इ.एम. रुग्णालयात त्यांनी १९६९ ते ७२ या तीन वर्ष कालावधीत स्त्री रोग तज्ञ म्हणून सेवा बजावली.

**मुंबई विद्‌यापीठात एम.डी. पदवीत प्रथम आले.**

स्त्री रोग तज्ञ म्हणून ३ वर्षे सेवा बजावल्यानंतर त्यांनी डॉक्टर ऑफ मेडिसीन साठी मुंबई विद्‌यापीठातून पुढील शिक्षण सुरु केले. विशेष म्हणजे मुंबई विद्‌यापीठात एम.डी. च्या परीक्षेत ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. एम.डी. च्या परीक्षेत प्रथम क्रमांक आल्याने त्यांना त्यावेळी प्रिन्स ऑफ वेल्स हे सुवर्ण पदक देवून त्यांचा सन्मान करण्यात आला होता. यानंतर त्यांनी मुंबई येथील टाटा

या कॅन्सर हॉस्पिटल मध्ये स्त्रीरोग तज्ञ म्हणून सन १९७३-७४ या एक वर्ष सेवा बजावली होती.

**मग पुढील शिक्षणासाठी ते इंग्लंड येथे गेले.**

वैद्यकीय क्षेत्राची ओढ असणारे डॉ. अनिल, एवढ्यावरच न थांबता, या क्षेत्रात विशेष अभ्यास करण्यासाठी १९७६ साली पुढील शिक्षणासाठी इंग्लंड येथे गेले. इंग्लंड येथील मेंबर ऑफ रॉयल कॉलेज मधील (OBGYN) ही वैद्यकीय पदवी त्यांनी संपादन केली.

**अमेरिकेत मिळाली विशेष स्त्री रोग तज्ञ पदवी**

इंग्लंड मधील शिक्षण पूर्ण केल्यानंतर, या क्षेत्रात मागे वळून न पाहता ते पुढे अमेरिकेत गेले. तेथे त्यांनी 'हनेमन मेडिकल कॉलेज' मध्ये स्त्रीरोग तज्ञ म्हणून १९७६ ते ७८ या दोन वर्षांच्या कालावधीत 'फेलो ऑफ अमेरिकन कॉलेज' (स्त्रीरोग तज्ञ) ही पदवी संपादन केली.

त्यानंतर डॉ. नेरुरकर ह्यांनी अमेरिकेतील हनेमन मेडिकल कॉलेजमध्ये स्त्रीरोग तज्ञ प्रोफेसर म्हणून आपले काम केले. तेव्हापासून ते आतापर्यंत अमेरिकेतील फिलाडेल्फिया या गावी स्त्रीरोग तज्ञ म्हणून ते वैद्यकीय सेवा देत आहेत. १९८१ सालापासून त्यांच्याबरोबर त्यांच्या पत्नी - प्रसिध्द लेखिका, कलाकार डॉ. मीना नेरुरकर ह्याही काम करीत आहेत.

आज शिक्षणासाठी परदेशात जाणे, नोकरीनिमित्त परदेशात राहणे व आपल्या देशाला विसरून जाणे हे आपल्याला नवीन नाही. याचप्रमाणे डॉ. नेरुरकर हे अमेरिकेत वास्तव्यास गेले. सुमारे सात एकरमध्ये त्यांची मालमत्ता व आलिशान बंगला आहे, चांगला व्यवसाय सुरु आहे, मुलेही चांगल्या क्षेत्रात आहेत. मुंबई येथील पूर्वाश्रमीच्याच्या डॉ. मीना वझे या डॉ. नेरूरकरांच्या पत्नी आहेत. डॉ. नेरुरकर यांना अदिती व तेजस ही दोन मुले आहेत. अदिती ही डॉक्टर असून ती जगातील प्रथम क्रमांकाच्या हार्वर्ड युनिर्व्हसिटीत एका विभागाची प्रमुख आहे. तर मुलगा हा माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात असून त्याने मार्केटिंगमध्ये स्वतःचे सॉफ्टवेअर काढलेले आहे. युरोप, अमेरिकेत व भारत या तीन ठिकाणी त्याची ऑफिसेस आहेत.

अश्याप्रकारे एवढी सारी सुखे, एका अतिप्रगत देशामध्ये हात जोडून त्यांच्या समोर उभी असताना कुणीही व्यक्ती स्वतः होवून त्रास काढण्यासाठी इथल्या लाल मातीची धूळ अंगावर घेण्यासाठी, येथील युवा पिढीच्या विकासासाठी घराघरात, शाळा-कॉलेजमध्ये वेडी भ्रमंती करण्यासाठी आलीच नसती, पण डॉ. नेरुरकरांचे आपल्या गावावरील, जिल्ह्यावरील, देशावरील प्रेम मात्र वेगळे होते. त्यांना ही लाल माती खुणावत होती. या भूमीसाठी काहीतरी केलंच पाहिजे यासाठी सतत खुणावत होती. शेवटी डॉ. नेरुरकरांनी या जिल्ह्याचा विकास आपल्या परीने करण्यासाठी सन २००९ वर्षापासून आतापर्यंत

प्रत्येक वर्षी किमान तीन वेळा या जिल्ह्यात येणे सुरु केले.

हे सर्व सुरु असताना ते मुंबई येथील टाटा कॅन्सर या रुग्णालयात गेले असता त्यांना येथील तंबाखू मुळे होणाऱ्या कॅन्सरच्या वाढत्या प्रमाण बाबतचे चित्र दिसले व त्यांनी सिंधुदुर्ग जिल्हा तंबाखू मुक्त करण्याच्या ध्यास घेतला. येथील युवापिढीसाठी काहीतरी केले पाहिजे, तंबाखूमुक्त जिल्हा केला पाहिजे, युवापिढी रोजगाराकडे वळलीच पाहिजे या हेतूने येथे विशेष उपक्रम राबविणे गरजेचे आहे. असे त्यांच्या मनात असतानाच १९९६ साली त्यांची भेट त्यांचे मित्र सी. बी. नाईक यांच्याशी झाली व त्या दोघांचाही सूर जुळून आला. व त्यांच्या दातृत्वास, कर्तृत्वास वेगळी ओळख मिळाली. वसुंधरा संस्थेच्या वाटचालीसाठी व प्रगतीसाठी आर्थिक मदत मिळवून देत ते वसुंधरा परिवाराचे एक सदस्यच होवून गेले. आज त्यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली वसुंधरा संस्थेच्या माध्यमातून 'तंबाखू मुक्ती अभियानाची' एक जिल्हाव्यापी व्यवस्था व चळवळ या जिल्ह्यात उभी राहिली आहे, व वाढत आहे. त्यावेळी सी. बी. नाईक ह्यांनी जिल्ह्यात विज्ञान केंद्र उभारणीचा ध्यास घेतला होता. त्यांच्या या कार्यात खांद्याला खांदा लावून डॉ. नेरुरकर या कार्यात उतरले. व त्यांनी सी.बी.नाईक यांनी स्थापन केलेल्या वसुंधरा विज्ञान केंद्राच्या माध्यमातून या जिल्ह्यात तंबाखू मुक्त अभियानाची एक जिल्हाव्यापी चळवळ सन २०११ पासून सिंधुदुर्गात सुरु केली.

या तंबाखूच्या आहारी गेलेला माणूस तंबाखू सोडणे तसे कठीणच म्हणून डॉक्टरांनी उमलत्या विद्यार्थी गटाला आपले लक्ष्य केले. या उमलत्या संस्कारक्षम वयातच योग्य ते संस्कार देण्याचे त्यांनी ठरविले त्याप्रमाणे शाळा कॉलेज मधील विद्यार्थ्यांना तंबाखूच्या गंभीर दुष्परिणामाची जाणीव देण्यासाठी प्रशिक्षित कार्यकर्त्यांची फळी त्यांनी उभारली. या कार्यकर्त्यांबरोबर वर्षातून जवळजवळ दोन महिने ते स्वतः या जिल्ह्यातील खेड्यापाड्यांतील शाळांमध्ये कॉलेजमध्ये दिवसातून तास दीड तासा व्याख्याने देत जिल्हाभर भ्रमंती करीत असतात. वयाची सत्तरी ओलांडलेले डॉ. नेरुरकर तसे पंचेचाळीस पन्नाशीचे वाटतात. आणि प्रत्यक्षात तिशीच्या वयाला शोभेत अशा उत्साहाने प्रचंड काम करीत असतात. हे काम करीत असताना सोबतचे सहकारी, हितचिंतक, कार्यकर्ते व मित्र परिवार यांच्यामध्ये उत्साह निर्माण करीत असतात. त्यामुळे कामाचा आढावा व वेग झपाट्याने वाढतो आहे.

दरवर्षी तंबाखू मुक्ती अभियानाच्या माध्यमातून शाळा कॉलेजमधील सामान्य लोकांसाठी तसेच विविध ऑफिसेसमधून सुमारे २०,००० व्यक्तींचे ते प्रबोधन करतात. कॅन्सरच्या प्राथमिक अवस्थेतील व्यक्तींचा शोध घेण्यासाठी गावागावातून तोंडाची तपासणी (ओरल कॅन्सर चेकप) ची शिबिरे ते घेत असतात. त्यासाठी मुंबईतील तसेच स्थानिक डॉक्टरांचे त्यांना सहकार्य मिळत असते. आतापर्यंत तपासणी शिबिरांतून त्यांनी व्यक्तींची तपासणी केलेली आहे. भयावह बाब म्हणजे आपल्या जिल्ह्यातून यापैकी म्हणजे जवळजवळ ०८% व्यक्ती प्राथमिक कॅन्सरग्रस्त आढळल्या. सध्यातरी

तंबाखू विरोधी त्यांचा हा एकाकी लढा चालू आहे. समाज, शासन, त्यांच्या सोबतीला आल्यास आपला जिल्हा भावी काळात तंबाखूजन्य कॅन्सर पासून मुक्त होऊ शकतो.

शाळा-कॉलेजमध्ये फिरताना आपल्या विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वासाचा अभाव असल्याचे त्यांना प्रकर्षाने जाणवले. त्यासाठी त्यांनी Be Your Own Boss ही संकल्पना राबविण्यासाठी वेगळी यंत्रणा व वेगळे प्रयत्न सुरु केले आहेत. व्यक्तिमत्व विकास शिबिरे, स्वतः तसेच इतर तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने शाळा कॉलेजमध्ये घेण्यास सुरुवात केली आहे. या उपक्रमासही वाढता प्रतिसाद मिळू लागला आहे. इंग्रजी संभाषण वर्ग काही ज्युनियर कॉलेज मधून सुरूही झाले आहेत. अरविंद नांदेसारखे जाणकार, प्रसाद गावकर व इतर तज्ज्ञ व्यक्ती त्यांना याबाबतीत सहकार्य करीत आहेत. डॉ. नेरूरकरांना अनेक पुरस्कार मिळाले असले तरी ह्या सर्व पुरस्कार, गौरवांसाठी नाही तर केवळ आणि केवळ येथील विशेष करून युवापिढी व नागरिकांच्या विकासासाठी ते झटत राहतील हे मात्र निश्चित असून सिंधुदुर्ग जिल्ह्याला त्यांच्या रूपाने एक अनमोल रत्नच मिळाले आहे.

**कुडाळ / रजनीकांत कदम: वर्धापन लेख**